जोडपत्र - एक

समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग
सचिवालय विस्तार, मुंबई    २९ ऑगस्ट, १९६०
भद्र ७, १८८२.

भारतीय संविधान
=============

क्रमांक टीएसी -११६०-जे: - भारतीय संविधानाच्या पाचव्या अनुसूचिच्या भाग ख परिच्छेद ४ या उपपरिच्छेद [३] अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि मुंबई जनजाती सल्लागार परिषद नियम १९५७ याचे अधिक्रमण करून, महाराष्ट्राचे राज्यपाल पुढील नियम करीत आहेत :-

१. संक्षिप्त नाव :- या नियमांना, महाराष्ट्र जनजाती सल्लागार परिषद नियम, १९६० असे संबोधावे.

२. व्याख्या :- संदर्भानुसार अन्यथा अपेक्षित नसेल तर या नियमांत —

[अ] " विधानसभा " म्हणजे महाराष्ट्र विधानसभा,

[ब] " परिषद" म्हणजे भारतीय संविधानाच्या पाचव्या अनुसूचीच्या भाग ख परिच्छेद ४ अन्वये महाराष्ट्र राज्यात स्थापन करण्यात आलेली जनजाती सल्लागारपरिषद,

[क] "राज्यपाल" म्हणजे, महाराष्ट्राचे राज्यपाल,

[ड] या नियमांत वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, भारताच्या संविधानात त्यांना नेमून दिल्याप्रमाणे अर्थ असतील.

३. परिषदेची रचना [१] परिषदेत पुढील वीस सदस्यांचा समावेश असेल :-

[एक] मुख्यमंत्री, पदसिध्द अध्यक्ष -

[दोन] आदिवासी कल्याण मंत्री, पदसिध्द उपाध्यक्ष.

[तीन] संचालक, आदिवासी कल्याण, महाराष्ट्र राज्य, परिषदेचे पदसिध्द सदस्य आणि सचिव.

[चार] राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचे असे विधानसभेत अनुसूचित जमातीचे प्रतिनिधी असलेले पंधरा [१५] सदस्य.

[पाच] राज्यपालांनी त्यांच्या मते राज्यातील अनुसूचित जमातीच्या किंवा अनुसूचित जमातींच्या किंवा अनुसूचित क्षेत्रांच्या गरजांचे विशेष ज्ञान व अनुभव असलेल्या व्यक्तींमधून नामनिर्देशित करावयाचे दोन सदस्य.

[२] अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सचिव यांसह, सदस्यांची नावे, शासकीय राजपत्रात प्रसिध्द करण्यात येतील.

कृ. मा. प.

४. <u>पदावधी</u> :- [१] नियम ५ व ६ यांच्या तरतुदींना अधीन राहून, १ ३ पोट-नियम [१] खंड [चार] अन्वये विधानसभेतील अनुसूचित जमातींचे प्रतिनिधी असलेला सदस्य, तो विधानसभेचा सदस्य असेपर्यन्तच परिषदेचे सदस्य म्हणून पद धारण करील.

[२] नियम ३, पोटनियम [ १ ] खंड[पाच] अन्वये राज्यपालाने नामनिर्देशीत केलेली व्यक्ती, तिच्या नामनिर्देशनाच्या तारखेपासून दोन वर्षापर्यन्त किंवा तिचा उत्तराधिकारी नामनिर्देशित केला जाईपर्यन्त यापैकी जी उशिराची असेल त्या मुदतीसाठी परिषदेच्या सदस्याचे पद धारण करील.

[३] या नियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परिषदेच्या सदस्याला, त्याच्या मुळे रिक्त होणाऱ्या पदावर यथास्थिती नविन सदस्य निवडला जाईपर्यन्त किंवा नामनिर्देशित केला जाईपर्यन्त आपले पद धारण करण्याचे चालू ठेवता येईल.

५. <u>सदस्याचा राजीनामा</u> :- अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा सचिव यांच्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही सदस्याला अध्यक्षाच्या नावे स्वत:च्या सहीनिशी आपल्या पदाचा राजीनामा पाठवता येईल, असा राजीनामा अध्यक्षाला ज्या तारखेस मिळेल त्या तारखेपासून तो अंमलात येईल.

६. <u>अनुपस्थितीमुळे पदरिकामे होणे</u> - अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा सचिव यांच्या व्यतिरिक्त इतर कोणताही सदस्य, परिषदेच्या परवानगीशिवाय, परिषदेच्या लागोपाठ तीन बैठकींना अनुपस्थित राहिल्यास परिषदेला त्याचे पदरिकामे झाल्याचे जाहीर करता येईल.

७. <u>रिक्त पदे भरणे</u> :- परिषदेच्या कोणत्याही सदस्याचे पदरिकामे झाल्यास, त्यासाठी नियम ३ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने ते रिक्तपद भरण्यात येईल.

८. <u>परिषदेच्या बैठकी</u> :- [१] परिषदेची बैठक सर्वसाधारणपणे सहा महिन्यांतून एकदा, अध्यक्ष ठरवील अशा ठिकाणी व अशा तारखेस भरेल.
[१] तथापि त्याला योग्य वाटल्यास आणि अध्यक्षांस परिषदेच्या पांचपेक्षा कमी नसणाऱ्या सदस्यांनी सहीनिशी लेखी मागणी केल्यास विशेष बैठक बोलावता येईल. सदस्यांच्या मागणीवरुन बोलावयाची विशेष बैठक ही, मागणी पत्र मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत बोलाविण्यात येईल.

कृ. मा. प.

३] परिषदेच्या प्रत्येक सदस्याला सर्वसाधारण बैठकीची, दहापूर्ण दिवसापेक्षा कमी नसेल इतकी अगोदर आणि . विशेष बैठकीची, पाचपूर्ण दिवसापेक्षा कमी नसेल इतकी अगोदर नोटीस देण्यात येईल. अशा नोटीशीमध्ये, बैठकीची जागा, तारीख व वेळ आणि बैठकीत करावयाचे कामकाज नमूद करण्यात येईल आणि मागणी पत्रावरुन बोलावण्यात येणा-या विशेष बैठकीच्या बाबतीत, अशी बैठक बोलावण्यासाठी मागणीपत्रामध्ये उल्लेख करण्यात आलेली कारणे नमूद करण्यात येतील.

९. गणपूर्ती :- परिषदेच्या बैठकीला अध्यक्ष वगळून चार सदस्य उपस्थित असतील तर, बैठकीची गणपूर्ती होईल.

१०. अध्यक्ष व उपाध्यक्ष उपसभापती यांची कामे :-

परिषदेच्या सर्व बैठकीचे अध्यक्ष पद स्वीकारणे हे अध्यक्षाचे कर्तव्य असेल कोणत्याही बैठकीत सभापतीच्या अनुपस्थितीत उपाध्यक्ष बैठकीचे अध्यक्षपद स्वीकारील आणि अशा रितीने तो अध्यक्षपदी असेल तेव्हा, या नियमांखाली अध्यक्षाकडे ज्या शक्ती निहित असतील त्याच शक्तींचा तो वापर करील.

११. कामकाजाच्या बाबींची सचिवाने छाननी करणे :-

सचिव हा बैठकीसाठी निश्चीत केलेल्या कामकाजाच्या प्रत्येक बाबीची तपासणी करील आणि त्याला त्यावर काही अभिप्राय द्यावयाचा असल्यास तो नमूद करील. प्रत्येक बाबीवरील त्याचा अभिप्राय ती बाब बैठकीत विचारार्थ घेण्यापूर्वी परिषदेच्या सर्व सदस्यांकडे फिरवण्यात येईल.

१२. कामकाज चालवणे :- [१] बैठकीत जे कामकाज चालेल त्यात, राज्यातील अनुसूचित जमातीचे कल्याण व प्रगती या विषयीच्या ज्या बाबी राज्यपालांनी सल्ल्यासाठी परिषदेकडे पाठविल्या असतील त्यांचा समावेश असेल.

[२] बैठक बोलावण्यासाठी काढण्यात येणा-या नोटीशीत विनिर्दिष्ट केलेले असल्याशिवाय बैठकीत कोणतेही कामकाज हाती घेतले जाणार नाही आणि कोणत्याही प्रस्ताव मांडण्यात येणार नाही किंवा त्यावर चर्चा केली जाणार नाही.

परंतु अध्यक्षाच्या मते जे कामकाज तातडीच्या स्वरुपाचे असेल आणि जे वाजवी कारणास्तव बैठकीच्या नोटीशीत नमूद करणे शक्य झालेले नसेल असे कोणतेही कामकाज बैठकीत हाती घेतल्यास किंवा अशा कोणत्याही प्रस्तावावर चर्चा करण्यास, अध्यक्ष स्वेच्छा निर्णयानुसार परवानगी देऊ शकेल.

[३] बैठकीतील कामकाजाच्या बाबी, अध्यक्ष निदेश देतील त्या क्रमाने, विचारार्थ घेण्यात येतील.

परंतु एखाद्या सदस्याने एका विशिष्ट बाबीस अग्रक्रम देण्यात यावा असा प्रस्ताव मांडला तर अध्यक्ष तो अग्रक्रमाचा प्रस्ताव मतास टाकतील आणि त्या प्रस्तावाच्या बाजूने किंवा त्याविरुद्ध जे बहुमत पडेल त्यानुसार त्या बाबीचा क्रम ठरवण्यात येईल.

[४] परिषदेपुढे विचारार्थ आलेल्या कोणत्याही विषयावर परिषदेने दयावयाचा सल्ला हा त्या बैठकीत उपस्थित असलेल्या व मतदान करणाऱ्या सदस्यांच्या बहुमताने ठरविला जाईल, मात्र समान मते पडली असतील अशा बाबतीत, अध्यक्षांना आपल्या स्वतःच्या मताशिवाय एक निर्णायक मत असेल आणि ते त्याचा वापर करतील.

[५] राज्यपालांनी परिषदेकडे निर्दिष्ट केलेल्या बाबींवरील परिषदेचा निर्णय आणि मते ही, शिफारशींच्या स्वरूपात असतील, मात्र कोणत्याही सदस्याला, परिषदेने मान्य केलेल्या कोणत्याही शिफारशींच्या संबंधात २४ तासांच्या आत भिन्न मत पत्रिका सादर करता येईल आणि अशी भिन्न मतपत्रिका, बैठकीच्या कार्यवृत्तामध्ये दाखल करण्यात येईल आणि ती कार्यवृत्ताचा एक भाग होईल.

[६] परिषदेची बैठक लोकांसाठी खुली असणार नाही.

१३. <u>परिषदेच्या चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी इतर व्यक्तींना पाचारण करण्याचे अध्यक्षाचे अधिकार</u>

नियम १२ च्या पोटनियम [६] मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अध्यक्षाला परिषदेच्या सदस्याखेरीज इतर कोणत्याही व्यक्तीला, परिषदेच्या चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी पाचारण करता येईल, मात्र अशा व्यक्तिला मतदान करण्याचा अधिकार असणार नाही.

१४. <u>रिक्त पदांमुळे कामकाजांना परिणाम न होणे</u>

परिषदेच्या सदस्यांपैकी कोणतेही पद रिक्त असल्याच्याच केवळ कारणावरून परिषदेच्या कोणत्याही कामकाजाबाबत हरकत उपस्थित करता येणार नाही.

१५. निमसरकारी सदस्यांना प्रवास भत्ता :-

[१] शिक्षण [३] या पोटनियम [१] याच्या खंड [एक] [दोन] आणि [तीन] मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या सदस्याखेरीज परिषदेचे इतर सदस्य मुंबई नागरी सेवानियम, १९५९, याचे परिशिष्ट वेचाळीस ए-याच्या कलम एक मधील नियम १च्या तरतुदींनुसार प्रवासभत्ता मिळण्यास पात्र असतील.

[२] पोटनियम [१] मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जर एखाद्या सदस्याने दुस-या कोणत्याही नात्याने प्रवासासाठी शासकीय कोषागारातून प्रवास-भत्ता घेतला असेल तर, त्याला त्याच प्रवासासाठी उक्त पोटनियमाखाली अनुज्ञेय असलेला प्रवासभत्ता घेता येणार नाही.

१६. संकीर्ण :- परिषदेच्या सचिव परिषदेने मंजूर केलेले सर्व ठराव आणि असल्यास भिन्नमतपत्रिका आणि परिषदेकडील इतर सर्व कागदपत्रे राज्यपालांकडे सादर करण्यासाठी सचिव, महाराष्ट्र शासन, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग यांच्याकडे पाठवील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

पी. जे. चिन्मुळगुंद,
शासनाचे सचिव

× अधिसूचना क्रमांक टीएसी १२६२-जे, दिनांक १३. ७. १९६९
× अधिसूचना क्रमांक टीएसी १२६४-जे, दिनांक १०. ४. १९६४.
× अधीसूचना क्रमांक टीएसी-१२६७/५१०४१-एम, दिनांक १. १२. १९६७.
× अधिसूचना क्रमांक टीएसी १२७७/२१९१९/एक्सव्ही दिनांक २९. ६. १९७७.
यांव्दारे सुधारले.

[यथार्थ अनुवाद]
य. श्री. कानिटकर
भाषा संचालक व
शासनाचे पदसिध्द उपसचिव,
सामान्य प्रशासन विभाग.